# 2.4 Teacher Profile and Quality

## 2.4.1. Number of Full Time Teachers against Sanctioned Posts during the Year

# CERTIFICATE

This is to certify that the documents attached in **Criterion II Teaching – Learning and Evaluation** are verified and found correct to the best of my knowledge.

Dr. C. R. Rumale
Principal
Principal
Radhadevi Goenka College
For Women, AKOLA

# Information about Sanctioned Post

महाराष्ट्र शासन

**कार्यालय, सहसंचालक, उच्च शिक्षण, अमरावती विभाग, अमरावती**

**Joint Director, Higher Education, Amravati Division, Amravati.**


दुरध्वनी क्र. ०७२१-२५३१२३५ फॅक्स ०७२१-२५३१४५७

Email- jdheamt@yahoo.com Web: jdheamravati.org.in


क्रमांक- ससं/उशि/अनि-१/पदनिश्चिती-२०१७/२०१९/633 दिनांक 23/1/२०१९

प्रति,

प्राचार्य

श्रीमती राधादेवी गोयनका महिला महाविद्यालय,

अकोला.

विषय :- दि.१.१०.२०१७ च्या विद्यार्थी संख्येच्या आधारावर शिक्षक व शिक्षकेतर पदांची अनुज्ञेयता

संदर्भ :- १. शासन निर्णय क्र. युएससी/११७८/२५२५१/रोमन-३२ सेल, दिनांक ११.६.१९७८

२. शासन निर्णय क्रमांक- एनजीसी/२०८०/१६०२८४/५९८७/युजीएफ-२ दि.१.६.१९८१

३. शासन निर्णय क्रमाक- एनजीसी/१२८६/१२२४/युजीएफ-४ दि.२७.२.१९८९

४. शासन निर्णय क्र. बीजीटी-१०९७/प्र.क्र.२४/अ/अर्थसंकल्प-११/दि.१५.१२.१९९८

५. शासन निर्णय क्र. असक-१००१/प्रक्र.२९/२००१/वित्तीय सुधारणा दि.१०.९.२००१

६. शासन निर्णय क्र.युएनजी-१४१३/(२६)/मशि-२ दि.१७.५.१९९४

७. शासन निर्णय क्र.एनजीसी/२२९९/(४७९५)/विशि-४ दि.१७.५.१९९४

८. शासन निर्णय क्र.असक-१००१/प्र.क्र.२९/(भाग-३)/२००२/वित्तीय सुधारणा, दिनांक ९.१.२००३

९. शासन निर्णय क्र.असक-१००१/प्र.क्र.२९/(भाग-६)/२००४/वित्तीय सुधारणा-१, दिनांक १.७.२००४

१०. शासन निर्णय क्र. एसआरव्ही-२००७/प्र.क्र.१२९/०७/१२, दि.२७.८.२००७

११. शासन परिपत्रक क्र.एनजीसी-२०१०/(४१५/१०)/विशि-१, दि.७.९.२०११

१२. शासन निर्णय क्र. संकिर्ण-२०११/(४०४/११)/विशि-१, दि.११.१०.२०११

१३. शासन निर्णय क्र.अढावा-१५१३/प्र.क्र.१२५/मशि-५ दि.३.११.२०१८

१४. आपले पत्र क्र. ४४४ दिनांक २०.११.२०१७

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, संदर्भ क्र.१४ नुसार प्राप्त झालेल्या प्रस्तावामधील आपल्या महाविद्यालयातील दि.१.१०.२०१७ च्या विद्यार्थी संख्येच्या आधारावर विषय निहाय विद्याशाखा निहाय कार्यभार तपासण्यात आला.

शासनाने विहीत केलेल्या मानकानुसार कार्यभाराची परिगणना करुन खालील अटिच्या अधिन राहून महाविद्यालयातील शिक्षकीय व शिक्षकेत्तर पदे अनुज्ञेय करण्यात आलेली आहेत.

**शासन मान्यता पात्र विद्याशाखानिहाय अनुदानित तुकडी व त्यातील विद्यार्थी संख्या**

| अ.क्र. | विद्याशाखा | कला | | वाणिज्य | | गृहविज्ञान | | पदव्युत्तर | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | तुकडया | विद्यार्थी संख्या | तुकडया | विद्यार्थी संख्या | तुकड्या | विद्यार्थी संख्या | तुकडया | विद्यार्थी संख्या | तुकडया | विद्यार्थी संख्या |
| १ | ११ वी | २ | १६२ | १ | १२० | ० | ० | ० | ० | ३ | २८२ |
| २ | १२ वी | २ | १५८ | १ | ११९ | ० | ० | ० | ० | ३ | २७७ |
| ३ | प्रथम वर्ष | ६ | ६२० | २ | २१४ | १ | ७३ | ० | ० | ९ | ९०७ |
| ४ | व्दितीय वर्ष | ४ | २४३ | २ | १७९ | १ | २५ | ० | ० | ७ | ४४७ |
| ५ | तृत्तीय वर्ष | ३ | १७८ | २ | १६९ | १ | ३१ | ० | ० | ६ | ३७८ |
| | **एकूण** | **१७** | **१३६१** | **८** | **८०१** | **३** | **१२९** | **०** | **०** | **२८** | **२२९१** |
| | प्रथम वर्ष | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | व्दितीय वर्ष | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | | | | | | | | | | ० | ० |
| | **एकूण** | **१७** | **१३६१** | **८** | **८०१** | **३** | **१२९** | **०** | **०** | **२८** | **२२९१** |

प्रपत्र-अ शिक्षकीय पदे

| अ.क्र. | विषय व पदं | २०१७-१८ चा एकूण कार्याभार | २०१७-१८ ची अनुज्ञेय पदे | २०१७-१८ची भरलेली पदे | २०१७-१८ ची रिक्त पदे | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्राचार्य | ५ | १ | १ | ० | वाणिज्य व पर्यावरण |
| २ | ग्रंथपाल | ० | १ | १ | ० | |
| ३ | शा.शि.संचालक | ० | १ | २ | ० | १ अतिरिक्त |
| ४ | इंग्रजी | १५३ | ८ | ५ | ३ | ३ नवीन पद |
| ५ | मराठी | ६९ | ३ | २ | १ | १ नवीन पद व ११ तासिका |
| ६ | हिंदी | ३५ | २ | २ | ० | |
| ७ | इतिहास | ४५ | २ | १ | १ | ७ घडयाळी तासिका |
| ८ | अर्थशास्त्र | ३० | १ | ० | १ | १० घडयाळी तासिका |
| ९ | राज्यशास्त्र | ५० | ३ | १ | २ | २ नवीन पद |
| १० | समाजशास्त्र | ५० | ३ | १ | २ | २ नवीन पदे |
| ११ | तत्वज्ञान | १५ | १ | १ | ० | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १२ | संस्कृत | २७ | १ | १ | ० | ७ घडयाळी तासिका |
| १३ | उर्दु | २७ | १ | ० | १ | ७ घडयाळी तासिका |
| १४ | गृहअर्थशास्त्र | ८३ | ४ | ४ | ० | ५ घडयाळी तासिका |
| १५ | संगीत | १६८ | ९ | ९ | ० | |
| १६ | वाणिज्य | १३६ | ७ | ४ | ३ | |
| १७ | गृहविज्ञान | २५१ | १३ | ९ | ४ | २ नवीन पदे |
| | **एकूण** | **११४४** | **६१** | **४४** | **१८** | |

**प्रपत्र-ब शिक्षकेतर पदे**

| अ.क्र | पदांचे नांव | अनुज्ञेय पदे | भरलेली पदे | रिक्त पदे | अतिरिक्त पदे | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रबंधक | १ | ० | १ | ० | १ नवीन पद |
| २ | अधीक्षक | १ | १ | ० | ० | |
| ३ | कनिष्ठ / वरिष्ठ लघुलेखक | १ | ० | १ | ० | |
| ४ | मुख्य लिपिक | १ | ० | १ | ० | |
| ५ | वरिष्ठ लिपिक | १ | १ | ० | ० | |
| ६ | कनिष्ठ लिपिक | ५ | ५ | ० | ० | |
| ७ | सहायक ग्रंथपाल | १ | १ | ० | ० | |
| ८ | ग्रंथालय लिपिक | १ | ० | १ | ० | |
| ९ | प्रयोगशाळा सहायक | ० | ० | ० | ० | |
| १० | प्रयोगशाळा परीचर | | ३ | ० | ० | संरक्षित |
| ११ | ग्रंथालय परिचर | ८ | ८ | ० | ० | |
| १२ | शिपाई | ८ | ८ | ० | ० | |
| | **एकूण** | **२८** | **२७** | **४** | **०** | |

**टिपः-** शासन निर्णय दि.३.११.२०१८ नुसार पदांची अनुज्ञेयता ठरविताना, पदांचा आढावा अंतिम झाला नसल्याने सदर अनुज्ञेय पदे अंतिम नाहीत हे आपणास निदर्शनास आणुन देण्यात येत आहे.

१. प्रस्तुतचा कार्यभार महाविद्यालयात कार्यरत असलेल्या अनुदानित विद्याशाखा/तुकडया/विषय व प्रवेशीत विद्यार्थी संख्या विचारात घेऊन परिगणीत होणारा कार्यभारत अनुज्ञेय करण्यात आलेला आहे.

२. महाविद्यालयाने पदनिश्चितीसाठी सादर केलेल्या प्रस्तावात नमुद केलेल्या विद्याशाखा / तुकडया / विषय व विद्यापीठाने प्रमाणित केलेल्या विद्यार्थीसंख्येची प्रत्यक्ष महाविद्यालयात पदनोंदणी अनिवार्य आहे.

३. अनुदानासाठी अनिवार्य असलेली विद्यार्थी संख्या व कार्यभार परीगणनेसाठी कमाल विद्यार्थी संख्या विचारात घेण्यात यावी.

४. प्रात्यक्षिकांसाठी शासन नियमानुसार विहीत केलेल्या विद्यार्थी संख्येची बॅच (गट ) अनिवार्य राहील.

५. व्यायाने / प्रात्यक्षिके / टयुटोरियल ( पाठनिर्देशन), प्रोजेक्ट वर्क (प्रकल्प कार्य) या करीता नमुद असणाऱ्या तासिका शासनाने विहीत केलेल्या नियमानुसार असणे आवश्यक आहे.

६. महाविद्यालयास अनुज्ञेय करण्यात आलेल्या पदांनुसार शासनाच्या प्रचलित आरक्षण धोरणानुसार विहीत प्राधिकरणामार्फत आरक्षण बिंदु नामावली प्रमाणित करणे आवश्यक आहे.

७. पुढील शैक्षणिक वर्षामध्ये विद्यार्थी संख्येत घट झाल्यास किंवा अन्य कारणास्तव अनुदानित विभागातील कार्यभार कमी झाल्यास अनुज्ञेय पदसंख्या मी करण्यात येईल.

८. अनुज्ञेय पदानुसार शासनाच्या प्रचलित धोरणानुसार शासनाच्या पूर्व परवानगी शिवाय पदभरती करण्यात येऊ नये. अशा अनुज्ञेय पदावरील नियुक्त्यांमध्ये अनियमितता आढळून आल्यास अनुदान निर्धारणात सदर बाब अमान्य करण्यात येईल. अनियमित नियुक्तीची जबाबदारी संबंधीत व्यवस्थापन व महाविद्यालय यांची राहील.

९. महाविद्यालयाच्या अनुदान पात्र कार्यभारावर आधारीत पदे अनुज्ञेय करण्यात आलेली आहे. अनुज्ञेय पदांवरील पदभरतीसाठी स्वतत्र पणे शासनाच्या प्रचलीत धोरण व कार्यपध्दतीनुसार प्रस्ताव सादर करुन ना-हरकत प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे

सहसंचालक, उच्च शिक्षण
अमरावती विभाग, अमरावती.

प्रतिलिपी :-

१. कुलसचिव, सत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती

२. लेखाधिकारी, उच्च शिक्षण अनुदान, अमरावती विभाग अमरावती.

महाराष्ट्र शासन
कार्यालय, सहसंचालक, उच्च शिक्षण,
अमरावती विभाग, अमरावती - ४४४ ६०४.

नी क्रमांक -०७२१-२५३१२३५
Email-jdheamt@yahoo.com

क्रमांक- सरां/उशि/अनि-२/प्र.आ./२०१६/३६०८ दिनांक २७.०९.२०१६

Smt Radhadevi Goenka College
For Wom... ...OLA
Inward No. 370
Date 5/10/16

प्रति,
प्राचार्य,
राधादेवी गोयनकामहाविद्यालय,
अकोला.

विषय : संस्थेअंतर्गत महाविद्यालयातील शिक्षक / शिक्षकेत्तर कर्मचा-याच्या रिक्त जागा भरण्याकरीता नाहरकत प्रमाणपत्र मिळणे बाबत.

संदर्भ :- १) शासन निर्णय, दिनांक ०५/०८/२०१०.
२)शासन निर्णय दिनांक २४/०८/२०१५
३) शासन निर्णय दिनांक १५/०१/२०१६
४)मा.शिक्षण संचालक,उच्च शिक्षण,महाराष्ट्र राज्य पुणे यांचे पत्र क्रमांक युएनआय/२०१६/१२०५१/२०१५ औवि/विशि-१/६१७५ दिनांक १३.०५.२०१६
५) मा.उच्च न्यायालय,खंडपीठ,औरंगाबाद यांनी दिलेला याचिका क्र.१२०५१/२०१५ चा निर्णय
६) आपले पत्र क्रमांक वायसीएम/एसआर/९४/१६ दि.०७.०५.२०१६.
७) संस्थेचे हमिपत्र दिनांक २१.०६.२०१६.

आपल्या वरील संदर्भीय पत्र क्र.६ अन्वये व आपण सादर केलेले हमीपत्राचे अनुषंगाने कळविण्यात येते की, या पत्राप्रमाणे आपण मागणी केल्या प्रमाणे **शिक्षक** कर्मचाऱ्याचे रिक्त पदावर सरळ सेवा भरतीने खुले/मागासवर्गीय सवर्गातील पदे भरण्याबाबत या कार्यालयाचे ना-हरकत प्रमाणपत्र पुढील प्रमाणे देण्यात येत आहे.

१) हया बाबत पुढील प्रमाणे सूचित करण्यात येते की, मागासवर्गीय सवर्गातील पदं भरण्याची कार्यवाही करतांना आपल्या महाविद्यालयातील **अतिरिक्त** ठरलेले शिक्षक कर्मचारी इतर महाविद्यालयातील रिक्त पदावर समायोजित झाले असतील तर अशा कर्मचाऱ्यांना आपल्या महाविद्यालयात किंवा आपल्या संस्थेच्या व्यवस्थापनाच्या इतर महाविद्यालयात पद रिक्त असेल तर त्या पदावर त्यांना प्रथम पाठवावे लागणार. त्यामुळे हे पद रिक्त समजण्यात येणार नाही.हयाची नोंद घ्यावी.

२) तसेच इतर महाविद्यालयातील अतिरिक्त शिक्षक कर्मचारी आपल्या महाविद्यालयात समायोजित झाले असतील तर असेही रिक्त समजले जाणार नाही. वर नमुद केल्या प्रमाणे आपल्या महाविद्यालयाचे पद समायोजीत किंवा अतिरिक्त नसेल तरच आपण मागासवर्गीय कक्षाने बिंदु नामावली मंजूर करुन दिल्यानुसार मागासवर्गीय सवर्गातील रिक्त पदांचा अनुशेष सरळ सेवा मधील पदे भरण्याकरीता शासन निर्णय १५.०८.२०१५ अन्वये खालील नमुद केलेली पदे भरण्याकरीता हया कार्यालयाचे ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

३) हे ना-हरकत प्रमाणपत्र महाविद्यालयात सध्यां रिक्त असलेल्या पदापुरतेच तसेच मागासवर्गीय कक्षाने निश्चित करुन दिलेल्या बिंदु नामावली मधील पदापुरतेच मर्यादीत आहे. **तसेच विद्यार्थी संख्या वाढल्यामुळे नव्याने पदे निर्माण होत असतील तर त्या पदाकरीता हे ना-हरकत प्रमाणपत्र लागु राहणार नाही. तसेच शासनाने वेळोवेळी लागु केलेल्या सरळ सेवा संदर्भातील शासनाने निर्गमित केलेल्या शासन निर्णयाच्या , न्यायालयीन निर्णयाच्या तसेच विद्यापीठ परिनियम आणि अध्यादेशाच्या अधिन राहुन हे नाहरकत प्रमाणपत्र देण्यात येत आहे.** अपंग अनुशेषावरील बंदी उठलेली असली तरी अपंग अनुशेष असल्यास तो भरण्याची कार्यवाही करण्यात यावी.

४) मागासवर्ग कक्ष संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अमरावती यांनी आरक्षण काढुन दिल्यानुसार त्यास सहाय्यक आयुक्त (मागासवर्ग कक्ष) अमरावती विभाग, अमरावती यांचे कडून प्रमाणित केल्यानंतरच पदे भरण्याची कार्यवाही करावी.

५) सदर ना-हरकत प्रमाणपत्र हे मा.उच्च न्यायालय,खंडपीठ,औरंगाबाद यांनी याचिका क्र.१२०५१/२०१५ वर दिलेल्या निर्णयाच्या आधिन राहून देण्यात येत आहे.

६) सदर ना-हरकत प्रमाणपत्र हे या कार्यालयाकडून पदांचे भरतीसंदर्भात व शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशाच्या व निर्णयाच्या तसेच मा.न्यायालयाच्या निर्णयाच्या आणि विद्यापीठ परिनियमाच्या अटिंच्या आधिन राहून शिक्षकांची पदे भरण्यास आपणांस ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

७) सदर नाहरकत प्रमाणपत्र मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथील याचिका क्र.१२०५१/२०१५ च्या अंतीम निर्णयाच्या अधिन राहून देण्यात येत आहे.

८) शासनाचे पत्र क्र.अशैसं-२०१६/प्र.क्र.०८७/२०१६/का-५द.२१/२०१६ दि.२१.०३.२०१६विद्यापीठाचे पत्र क्र.संगाबाअवि/८-सी/१५११/२०१६ दि.१६.०८.२०१६ नूसार आपल्या महाविद्यालयाला सत्र २०१५-१६ पासून भाषीक-मारवाडी दर्जा प्राप्त झाला आहे. करीता त्यामध्ये दिलेल्या अटींच्या अधिन राहून कार्यवाही करावी.

| अ.क्र. | पदाचे नांव | विषय | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| | | अ.क्र. | विषय | एकुण पदे | |
| १ | सहाय्यक प्राध्यापक | १ | गृहविज्ञान | ०१ खुला | प्राचार्य/सचिव यांच्या दिनाक २२.०९.२०१६ च्या सादर केलेल्या विनंतीनुसार सदर प्रमाणपत्र देण्यात येत आहे. |
| | | २ | उर्दु | ०१ खुला | |

AAR
सहसंचालक, उच्च शिक्षण,
अमरावती विभाग. अमरावती.

प्रतिलीपी :- माहीती तथा उचित कार्यवाहीकरीता.
१.कुलसचिव, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती, यांना अग्रेषित.
२.मा. शिक्षण संचालक, ( उ.शि) महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांना उचित कार्यवाहीस्तव सादर.